**CNR No.MHSI01000787-2022**

## <u>निशाणी ५८ खालील आदेश</u>

अर्जदार यांनी सदरचा अर्ज कागदपत्रांना निशाणी देण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जावर सामनेवाला क्र. १, २ व ३ यांनी म्हणणे दाखल करून विरोध केलेला आहे. विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अर्जदार यांचे अर्जामध्ये कथन की, अर्जदार यांनी प्रस्तुत कामी निशाणी ५१ येथे मयत सुधिर लब्धे यांचा निशाणी ५२ च्या कागदपत्र यादीसह शाळा सोडल्याचा दाखला व आधारकार्ड यांची मुळ प्रत हजर केलेली आहे. सदर कागदपत्रे ही मुळ प्रतीमधे दाखल असून त्यांच्या झेरॉक्स प्रती यापुर्वी अर्ज दाखल करतेवेळी दाखल आहेत. परंतु, त्यास निशाण क्रमांक देण्यात आलेले नाहीत. तरी, निशाणी ५१ व ५२ सोबत हजर केलेल्या शाळा सोडल्याचा दाखला व आधारकार्ड यांना निशाणी क्रमांक देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

३. सामनेवाला क्र. १ यांनी अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध केलेला आहे आहे की, अर्ज चुकीचा व बेकायदेशीर आहे. अर्जदार यांनी पुरावा बंद केलेला असल्याने दिलेला पुरावा घेवू नये. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. सामनेवाला क्र. २ व ३ यांनी अर्जावर म्हणणे दाखल केलेले आहे की, न्यायप्रविष्ट योग्य तो आदेश पारित करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जदार यांचा अर्ज व त्यावरील सामनेवाला क्र. १, २ व ३ यांचे म्हणणे याचे अवलोकन केले असता, शाळा सोडल्याचा दाखला व आधारकार्ड हे मुळ हजर

केलेले आहे. त्यामुळे सदर कागदपत्रे ही या अर्जाच्याकामी आवश्यक आहेत. सबब, सदर कागदांना निशाणी देणे योग्य व न्यायिक असे होणारे आहे. म्हणून वरील कारणास्तव मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपिलार्थी यांचा निशाणी ५८ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. संबंधीत कागदपत्रांना निशाणी देण्यात यावी.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR

Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2026.06.12 17:25:17 +0530

(श्री.एस.एस.इंदलकर)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
सिंधुदुर्ग–ओरोस.

सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांक– १२/०६/२०२६